
# WOMEN'S STATUS IN INDIAN SOCIETY






• EDITOR •

**Dr. Vandana Bankar**

• C0- EDITOR •

**Pratibha Agharde**

# Women's Status in Indian Society

◈ EDITOR ◈

**Dr. Vandana Namdeo Bankar**

Head, Department of Home Science*
Member of B.O.S. (Home Scinece),
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,
Aurangabad (M.S.)

◈ CO-EDITOR ◈

**Pratibha Vishnu Agharde**

Assistant Professor,
Department of Home Science*

◈ EDITORIAL BOARD ◈

1) **Dr. Vikramsingh Pawar** (Head, Dept. of Hindi)*
2) **Dr. Anita Khandagale** (Head, Dept. of Marathi)*
3) **Dr. Purushottam Mangate** (Head, Dept. of Sociology)*
4) **Asst. Prof. Vandana Patil** (Dept. of Marathi)*
5) **Asst. Prof. Sunil Kale** (Dept. of Hindi)*

***Arts and Science College Chincholi (Li.)**
**Tq. Kannad, Dist. Aurangabad (M.S.)**

**Women's Status in Indian Society**

ISBN : 978-93-88158-03-9

© Bharat Jamdhade

Editor
**Dr. Vandana Namdev Bankar**

Co-Editor
**Pratibha Agharde**

**Publisher**
**Bharat Jamdhade**
Apoorv Publishing House,
B-2/15, Sunny Center, Pisadevi Road, Aurangabad (M.S.)
Mob. - 9049591747, 8177803216
Email - apoorvjamdhade@rediffmail.com
bharatjamdhade1976@gmail.com

**Edition :** 25 August 2018

**DTP**
Dr. Yajuwendra Wankar
Mob. 9763830016

**Cover page**
Shlok Design, Bharat Bazar, Aurangabad

**Offset**
Rudrayani Offest, MIDC, Cidco, Aurangabad.

**Price :** ₹ 475/-

---

**Note :** The views expressed by the authors in their research papers in this book are their own. The Editor/ publisher is not responsible for them. Author is responsibile for all grammatical error Subject to Aurangabad (MS) Jurisdiction.

७१. डॉ. युवराज धबडगे
दलित कवयित्रींची कविता........................................................................ १९७
७२. प्रा. पंडित गडकरी
मानवी अधिकार आणि महिला........................................................................ २००
७३. संजय त्र्यं. साळवे
भारतीय राज्यघटना निर्मितीमध्ये महिलांचे योगदान........................................................................ २०३
७४. लिना उराडे
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते स्त्री आणि मानवी हक्क........................................................................ २०६
७५. प्रा. डॉ. दिलीप बिरुटे
स्त्रीवादी साहित्य समीक्षा : एक आकलन........................................................................ २१०
७६. कु. अनिषा दादाजी डोहे
भटक्या जमातीतील स्त्री जीवन........................................................................ २१२
७७. प्रा.रेखा लालाजी मेश्राम
डॉ. आंबेडकर व स्त्रियांची आर्थीक स्थिती–एक अध्ययन........................................................................ २१४
७८. रीना गोखले, बी.के. पाण्डव
स्त्री जन्माच्या कथा आणि व्यथा........................................................................ २१७
७९. प्रा. वाघमारे आर.वाय
महिला सशक्तीकरणामध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची भूमिका........................................................................ २१९
८०. डॉ.आशा एम. धारस्कर-भावसार
समाज परिवर्तनात स्त्री शिक्षणाची भूमिका........................................................................ २२१
८१. शारदा पाटील, डॉ.यु.पी. भंडागे
स्त्रियांवरचे अत्याचार आणि पुरूषी मानसिकता........................................................................ २२४
८२. प्रा.डॉ. निरंजन कौर सरदार
सामाजिक बदलातील स्त्री शिक्षणाची भुमीका........................................................................ २२६
८३. डॉ. घोडजकर विजयालक्ष्मी राजेश
दलित /ग्रामिण /आदिवासी महिलांसमोरील आव्हाने........................................................................ २३०
८४. डॉ. श्रीमती सुभेदार बी. पी.,राऊत सतिश रमेशपंत
औरंगाबाद शहरातील जिल्हा परीषद व अनुदानित माध्यमिक
शाळेतील स्त्री शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास''........................................................................ २३३
८५. प्रा. डॉ. अशोक सरवदे
बौद्ध धम्म आणि स्त्री मुक्ती........................................................................ २३८
८६. कु. आकाश आनंदराव नलावडे, डॉ. अनिता संभाजी पिसाळ
महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी समाजातील स्त्रियांच्या समस्या........................................................................ २४०
८७. प्रा. डॉ.जगतवाड शिवाजी पिराजी
स्त्री लेखिकांच्या साहित्यातुन आलेल्या स्त्री समस्या........................................................................ २४३
८८. प्रा. मुरुडकर एम.एस.
भारतातील स्त्री-पुरुष असमानता - एक समस्या........................................................................ २४६
८९. श्री. सातव समाधान काशिराम
'रारंगढांग' या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखांचे स्थान........................................................................ २४८

NCIWOC ISBN 978-93-88158-03-9

# ८०. समाज परिवर्तनात स्त्री शिक्षणाची भूमिका

डॉ.आशा एम. धारस्कर-भावसार

शासकीय अध्यापक महाविद्यालय अकोला

परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. कोणतीही वस्तू, विषय किंवा विचार स्थिर राहू शकत नाही त्यात काही ना काही परिवर्तन सदैव चालु राहते. स्थिर समाजाची कल्पना करणेच आजच्या काळात असंभव आहे. वास्तविक समाजाशी संबंधीत विभिन्न पैलुंमध्ये होणाऱ्या परिवर्तनास समाजिक परिवर्तन असे म्हणतात. समाजात सामंज्यस्य व गतिशीलता टिकायची असेल तर होणाऱ्या आंतरक्रिया-परिवर्तनशील असाव्या लागतील. अन्यथा मानव समाजाची प्रगती संभव होवू शकत नाही. निश्चित व निरंतर परिवर्तन हे मानवी समाजाचे मुख्य वैशिष्टे आहे.

सामाजिक परिवर्तन प्रक्रियेमध्ये समाजाची संरचना व कार्यप्रणालीचा एक नवीन जन्म होतो या अंतर्गत मूलत: प्रस्थिती, वर्ग, स्तर तसेच व्यवहार याचे विविधांगी स्वरूपात बदल घडून येतात. कधी तथ्यहीन ठरतात. तर काही परिवर्तन आकस्मिक स्वरूपाचे ठरतात. तर काही सामाजिक परिवर्तन स्पष्ट आणि दृष्टिगत असतात. पण काही परिवर्तने प्रत्यक्ष न बघता येणारी असतात. केवळ अनुभवाने ती स्वीकारावी लागतात.

सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करतांना मुख्यत: तीन बाबींचा विचार करणे अपेक्षीत असते.

(१) सामाजिक संरचनेतील परिवर्तन
(२) संस्कृतीमधील परिवर्तन
(३) परिवर्तनाचे घटक.

के.डेविसच्या मते-सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संगठन. अर्थात समाजाची संरचना व समाजाच्या विविध कार्यातील परिवर्तन. याविषयी गिडेन्स म्हणतो, सामाजिक परिवर्तनचा अर्थ पायाभूत संरचना (Underlying Structure) अथवा मूळ संस्था (Basic institutions) मधील परिवर्तन.

यावरून समाजपरिवर्तनही एक व्यापक प्रक्रिया आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, नैतिक भौतिक, राजकीय, धार्मिक अशा सर्व क्षेत्रांत घडून येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या परिवर्तनास सामाजिक परिवर्तन म्हणतात. परिवर्तनही सार्वत्रिक स्वरूपाची घटना आहे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात परिवर्तन होत असले तरी हे परिवर्तन सामाजात का आणि कसे होते याबाबतीत एकमत दिसून येत नाही. कोणत्याही समाजातील परिवर्तनाची गती कशी असेल हे त्या समाजातील सद्य:स्थितीतील परिवर्तनाच्या कारणांवरून आणि त्या कारणाचे समाजातील असलेले महत्व यावर निर्धारित असते.

शिक्षण ही काळाची गरज आहे. शिक्षणाने मानवात खूप मोठ्या प्रमाणावर बदल झालेत. मानवाला आपल्या हक्काचे महत्व समजते. शिक्षणाने व्यक्ती आपल्या गरजा, आवडी-निवडी तसेच हक्क याविषयी जागृत होत असलेला भ्रष्टाचार थांबवू शकतात सावित्रीबाई व जोतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी सामाजिक क्रांतीची मशाल हाती घेतली आणि स्त्री शिक्षणाने सामाजिक परिवर्तनास आणखी चालना मिळाली. म्हणून स्त्री शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचाच एक भाग आहे.

स्त्री शिक्षणाने स्त्री स्वातंत्र्य, समान अधिकाराची भावना, स्त्रियांची आत्मनिर्भरता बाल-विवाहावर बंदी, लैंगिक शोषणावरील निर्बंध यासारख्या अनेक परिवर्तनीय घटना महत्वाच्या स्वरूपाच्या ठरल्यात.

मुलगी शिकली, प्रगती झाली हे आपण सतत ऐकत असतो. स्त्री शिक्षणाने समाजात मोठया प्रमाणावर सुधारणा होतांना दिसून येतात. कारण एक शिकलेली मुलगी संबंध कुटुंब सुशिक्षीत, सुसंस्कृत करते. स्त्री एकप्रकारे कुटुंबाचा आस असते. आणि या आसाभोवती संपूर्ण कुटुंब फिरत असते. शिक्षण हेच स्त्रीउध्दाराचे व समाजपरिवर्तनाचे साधन आहे. म्हणून स्त्रियांना शिक्षण देणे गरजेचे आहे. सुशिक्षित आईच पुस्तकी ज्ञानाबरोबरच समाजात वावरण्याचे धडे मुलांना देत असते. चांगल वागणं, योग्य-अयोग्य याची जाणिव, सच्चेपणा, प्रामाणिकपणा, प्रेम, माया आपुलकी, सहकार्यवृत्ती, सामाजिकतेची जाणिव असे कितीतरी संस्कार मुलांवर घडविण्यात स्त्रियांची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यामुळे सर्वच बाबतीत सशक्त भावी पिढी निर्माण करण्याचे स्त्रियांचे कार्य मौलिक ठरते. शिक्षणाने स्त्रीला आर्थिक स्वातंत्र मिळाल्याने आपोआपच

इतर क्षेत्रातही स्त्री स्वातंत्र्य उपभोगू शकते ज्यातुन समाज परिवर्तनास चालना मिळते.

आज २१व्या शतकात शहरापासुन दूर असलेल्या गावात, खेडोपाडी, आदिवासी वस्त्यांमध्ये मुलींच्या शिक्षणास मदत करणे, त्यामधील समस्यांची पूर्तता करणे, स्वच्छतेचे धडे देणे, आरोग्यविषयक उपक्रम राबविणे यातून मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करून समाजात होणाऱ्या विविधांगी बदलास चालना देण्यास मदत होते. म्हणूनच समाजात जर बदल घडवून आणा-आणावयाचा असेलतर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे आधीच सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी ओळखले होते. बदल सामान्य माणूस सहजासहजी स्वीकारत नाही. हे त्यांना ठाऊक होते.

ज्याकाळात समाजव्यवस्थेच्या भिंती अतिशय मजबूत होत्या त्या भिंतीमध्ये सर्वात जास्त स्त्री गुदमरली होती. व तिला समाजात मोकळा श्वास घेता यावा यासाठी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. हे जाणुन स्त्रीशिक्षण समाज परिवर्तनासाठी आवश्यक बाब बनले. खऱ्या अर्थाने शिक्षणामुळे समाजक्रांतीची सुरवात झाली. अनादी काळापासुन अज्ञान अंधश्रध्दा भ्रृणहत्या निर्मुलन विधवाविवाह अशा अमानवी प्रथेला लगाम लावण्याचे काम स्त्रिशिक्षणाने होवू शकले. स्त्रीशिक्षणानेसमाजात आमूलाग्र बदल झालेला आपण पाहतो याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज राष्ट्रपती, पंतप्रधान लोकसभेच्या अध्यक्षापासुन ते सर्वच क्षेत्रात महिला प्रगतीपथवर दिसुन येते. म्हणुन "मुलींचे शिक्षण हे प्रगतीचे लक्षण" असते. मुलींना शिक्षणाने अर्थाजनाची, उदरनिर्वाहाची साधने प्राप्त झाल्याने सामाजिक दर्जा वाढला. स्त्रीशिक्षणाने समाजात आमूलाग्र बदल होऊन स्त्रियांचा स्व:उन्नतीचा मार्ग खुला झाला.

वास्तविक पाहाता भारतात वैदिक काळापासून स्त्रीशिक्षणाचा व्यापक प्रमाणात प्रचार झालेला दिसून येतो मुगलकाळात सुध्दा अनेक महिला विदुषींचा उल्लेख मिळतो. पुढे समाज पुन:र्जागरणच्या काळात स्त्री शिक्षणला नवीन दिशा प्राप्त होत गेली. सर्वप्रथम इ.स. १८५४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीव्दारे स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करण्यात आला. आणि महिलांसाठी शिक्षण सुरू करणारे कलकत्ता विद्यापीठ हे प्रथम विद्यापीठ ठरले. इ.स. १९८६ मध्ये प्रत्येक राज्याने सामाजिक संरेचनेसोबतच शिक्षणासंबंधीचे राष्ट्रीय धोरण ठरवून शिक्षणाचे पुन:र्गठन करण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत जास्तीत जास्त मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, शाळेतील मुलींची उपस्थिती वाढविणे, आणि मुलींसाठी विविध योजना कार्यांन्वित करणे उदा.-मोफत पाठयपुस्तके, माध्यान्ह भोजन यासारख्या योजना.

शासनाने समाजाची प्रगती, लोकशाहीचा विकास आणि महिलांची स्थिती सुधारणे यासाठी शिक्षणाची गरज स्पष्ट केली. स्त्रीशिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी व महिला साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी "साक्षर भारत मिशन"ची सुरवात केली. सामाजिक गतिशीलतेचा विचार करता स्त्रियांसाठी मुलभूत शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले. आणि मुलभूत आरोग्य, पोषण, कुटुंब नियोजन यांची समज या दृष्टीने आज स्त्रियांना शिक्षण दिले जात आहे. सामाजिक परिवर्तनाचा विचार करता स्त्रीशिक्षण हे दारिद्रयावर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीतील एक महत्वपूर्ण पाऊल आहे. दुर्दैवाने एखाद्या कुटुंबातील पुरुष दिव्यांग झाल्यास अशा परिस्थितीत कुटुंबाचे ओझे महिलांवर येवून पडते. यासारख्या गरजा पुर्ण करता याव्यात म्हणूनही स्त्रिांना शिक्षण दिले गेले पाहिजे. आज विविध क्षेत्रात स्त्री प्रवेश करते आहे. शिकलेली स्त्री उत्कृष्ट आई बनू शकते.

स्त्रीशिक्षणाने स्त्रीपुरूष समानता हुंडापध्दती, बेरोजगारीची समस्या अशाप्रकारच्या सामाजिक शांततेशी संबंधीत बाबी सहजपणे सोडविल्या जात आहे. संस्कृतमध्ये एक वचन आहे. "नास्ती विधासमं चक्षुर्नास्ति मातृ समागुरू:" याचा अर्थ या जगात शिक्षणासारख्या क्षेत्र नाही आणि मातेसमान गुरू नाही. कारण बालकाच्या विकासावर सर्वप्रथम आणि सर्वात जास्त प्रभाव मातेचाच असतो. आणि म्हणूनच स्त्रीशिक्षण हे पुरूषांच्या शिक्षणाएवढेच किंबहुना जास्त महत्वपूर्ण ठरते. समाजाची नवीन संरचना तयार करण्याच्या दृष्टीने व सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने स्त्रीशिक्षण हे पुरूषांच्या शिक्षणापेक्षा कितीतरी पटीने उपयुक्त ठरू शकते. स्त्रीशिक्षणाने समाजात होणाऱ्या अनिष्ट घटना, अत्याचार यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

स्त्री शिक्षणाने व्यक्तिस्वातंत्र्य हे महत्वाचे मूल्य जोपासले जाऊन सामाजिक हिताची चौकट निर्माण होण्यास मदत होते. तसेच मुलींमध्ये समाजनिष्ठा, सामाजिक जबाबदारीची जाणिव, नागरिकत्वाची भावना, सहकार्यवृत्ती, बौध्दिक, वैचारिक विकास, नि:स्वार्थ सेवावृत्ती, चारित्र्य अशा गुणांचा विकास होत असल्याने भारताच्या राज्यघटनेने नव्या समाजाचा जो आदर्श ठेवला आहे. त्याची निर्मिती सहजसुलभ होते. व त्यातून सामाजिक बदलांना चालना मिळते. भारतीय समाजरचनेतील विषमतेची बीजे जीवनविषयक व सामाजिक मुल्यांत आहे ती नष्ट करून नवी मुल्याची रूजवणूक करणे शिक्षणाने साध्य होते. सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने नव्या पिढीला उदारमतवादी घडविण्याचे कार्य स्त्रिशिक्षणाने सुकर होते.

राज्यघटनेने घोषित केल्याप्रमाणे व्यक्ति स्वातंत्र्य, समता, बंधुभाव आणि न्याय या मानवी विकासाला आवश्यक असणाऱ्या तत्वांवर भारतात लोकशाही समाजवादी समाजरचनेची निर्माण करावयाची

NCIWOC ISBN 978-93-88158-03-9

आहे. त्यासाठी राजकीय स्वरूपाच्या लोकशाही बरोबरच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतीक स्वरूपाची लोकशाही प्रस्थापित झाली पाहिजे. त्याचप्रमाणे सामाजिक जीवनातील समतेबरोबरच आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात समता आली पाहिजे. त्यासाठी संधीची समानता आवश्यक आहे. संधीच्या समानतेत न्यायाचे तत्व आहे. अशाप्रकारे स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्वांवर आधारलेला समाज निर्माण करावयाचा तर सर्वांनी काही समान ध्येय व मूल्ये यांचा स्वीकार केला पाहिजे त्यांची जपवणूक केली पाहिजे. एकसमान राष्ट्रीय संस्कृती निर्माण केली पाहिजे. समाजातील या बदलांसाठी स्त्रिशिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

नवसमाज निर्मितीसाठी, समता प्रस्थापित करण्यासाठी केवळ कायद्याची तरतूद पुरेशी नाही. त्यासाठी स्त्रिशिक्षणाची आवश्यकता आहे सामाजिक परिवर्तनासाठी हृदय परिवर्तन झाले पाहिजे. मनोवृत्ती घडविण्याचे कार्य शिक्षणातून होत असल्याने परस्परांमधील स्नेह, बंधुभाव, सेवावृत्ती, इतरांसाठी त्याग करण्याची वृत्ती, कोणाचेही शोषण न करण्याची व प्रत्येकास न्याय देण्याची बुध्दी या भावनांची जोपासना शिक्षणातून होत असल्याने सामाजिक परिवर्तनास नवी गती प्राप्त होत जाते.

स्त्रियांसाठी प्रत्येक क्षेत्रातील स्वतंत्र प्रज्ञेचा, कल्पकतेचा व सर्जनशीलतेचा शोध घेऊन त्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन शिक्षण प्रक्रियेतून होत असल्यने समाजाच्या प्रतयेक क्षेत्रात, प्रत्येक घटकांत नव्या नेतृत्वाची निर्मिती होत आहे. स्त्रियांना समाजात सगळीकडे समान वागणूक, सार्वजनिक ठिकाणी स्त्रियांना प्रवेश करण्याला निर्बंध रहाणार नाही, व्यवसाय नौकरीच्या क्षेत्रातही स्त्रियांवर बंधने रहाणार नाहीत. त्यांच्या आवडी-निवडीनूसार कोणताही व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य आणि शैक्षणिक, सांस्कृतिक हितसंबंध अबाधित राखले जातील. तसेच नवसमाजरचनेत स्त्रियांना विकासाची भरपूर संधी व सोयी स्त्रिशिक्षणाने प्राप्त होत असल्याने समाजात आमूलाग्र बदल घडवून येत आहेत.

सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने स्त्रिशिक्षण राष्ट्रियत्वाची व पर्यायाने समाजाची शक्ती वाढविण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. राष्ट्रीयत्व ही एक स्थिरवृत्ती आहे, अभिवृत्ती आहे व योग्य संस्कारांनी ती विकसित करणे शक्य आहे. स्त्रिशिक्षणातून राष्ट्रियत्वास पोषक असे संस्कार मुलींवर होत असल्याने आपली संस्कृती, तत्वज्ञान व परंपरा आणि आपल्या देशाची भौगालिक व ऐतिहासिक वैशिष्टे यांची जाणारे मुलींमध्ये निर्माण होते. भिन्न भाषिकांच्या संस्कतीमध्येही श्रध्दा, आचार, सण समारंभ, कलाकौशल्यांचे प्रकार याबाबतीत समानता असल्याची जाणिव, राष्ट्रीय संस्कृती व परंपरांबद्दलचा अभिमान यामुळे सामाजिक बदलांना प्रोत्साहन मिळते.

म्हणुनच आधुनिक होऊ इच्छिणाऱ्या समाजाने सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टिने स्वतःसोबतच समाजाचा महत्वपूर्ण घटक असणाऱ्या स्त्री घटकाला सुशिक्षीत केले पाहिजे. स्त्रीशिक्षणाची पातळी वाढवली पाहिजे. समाजाच्या सर्व स्तरांतून स्त्रियांचा समावेश झाला पाहिजे त्यांच्या आकांक्षा व निष्ठा भारताच्या भूमिकेत खोलवर रूजल्या जाव्यात जेणेकरून समाजात अत्यंत गतीने होणारी ज्ञानाची वाढ आणि त्यामुळे स्त्रियांच्या वैचारिक विचार करणे, निर्णय घेणे, नेतृत्व करणे अशा मानसिक कौशल्य वृध्दीमुळे स्त्रियांमध्ये क्रांतीकारक बदल घडून आल्याने त्याचा विधायक परिणाम समाज परिवर्तन प्रक्रियेवर दिसून येतो आहे.